महाराष्ट्र शासन

**क्र. करोना-२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५**
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो. ते. रुग्णालय आवार इमातर,
नविन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक- ०६.०६.२०२०

प्रति,

जिल्हाधिकारी ............ .................. (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका ................ (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक ................. (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी ................ (सर्व)

**विषय: कोवीड-१९ चाचणी पॉझिटीव्ह आलेल्या अति सौम्य किंवा लक्षणे नसलेल्या (Asymptomatic) व्यक्तींसाठी घरी करावयाच्या विलगीकरणाविषयी मार्गदर्शक सूचना**

१) उद्देश/व्याप्ती -

भारत सरकारच्या ७ एप्रिल २०२० रोजीच्या संदर्भान्वये कोवीड-१९ संशयित/पॉझिटीव्ह असलेल्या रुग्णासाठीच्या योग्य व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक सुचना यापुर्वी निर्गमित झाल्या असून, त्यानुसार सर्व संशयित (ज्यांचे प्रयोगशाळा तपासणी अहवाल प्रतिक्षेत आहेत), व पॉझिटीव्ह रुग्णांना रुग्णालयामध्ये विलगीकरणासह योग्य व्यवस्थापनाद्वारे आजाराचे संक्रमण खंडीत करण्याविषयी सुचित केले आहे.

प्रचलित मार्गदर्शक सुचनेनुसार, प्रतिबंधित कालावधीमध्ये रुग्णांना वैद्यकियदृष्टया लक्षणानुसार लक्षण नसलेले/सौम्य वा अतिसौम्य लक्षणे, मध्यम तीव्र लक्षणे व तीव्र लक्षणांमध्ये वर्गीकृत करावयाचे असून, त्यानुसार रुग्णांना अनुक्रमे अ) कोवीड केअर सेंटर (CCC) ब) डेडिकेटेड कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) व क) डेडिकेटेड कोवीड हॉस्पिटल (DCH) येथे दाखल करावयाचे आहे. तथापि, अति सौम्य किंवा लक्षणे नसलेल्या कोवीड पॉझिटीव्ह रुग्णांना जर त्यांचे घरामध्ये योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध असतील तर त्यांचे संमतीनुसार घरी विलगीकरणाचा पर्याय (Home Isolation) उपलब्ध करुन देता येईल. याकरीता खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२) गृह विलगीकरणासाठीची पात्रता -

- उपचार करण्याऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी रुग्णास अति सौम्य किंवा लक्षणे नसल्याबदल वैद्यकियदृष्टया प्रमाणित केलेले असावे.
- संबधित रुग्णांच्या घरी त्यांच्या विलगीकरणासाठी तसेच कुटुंबातील व्यक्तींकरीता अलगीकरणासाठी (Home Qurantine) योग्य सोई-सुविधा उपलब्ध असाव्यात.
- घरी दिवस-रात्र (24×7) काळजी घेणारी व्यक्ती उपलब्ध असावी. संबधित काळजीवाहू व्यक्ती व उपचार देणारे रुग्णालय यांच्यामध्ये संपर्क व्यवस्था (दुरध्वनी/मोबाईल) उपलब्ध असणे अनिवार्य आहे.
- वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार काळजीवाहू व्यक्ती व सर्व निकट संपर्कातील व्यक्तींनी प्रोटोकॉलनुसार हायड्रॉक्सी क्लोरोक्विनची मात्रा घ्यावी.
- मोबाईलवर "आरोग्य सेतू" ॲप डाऊनलोड करावे व ते सतत ॲक्टिव्ह(Bluetooth/Wi-fi द्वारे) असेल याविषयी दक्ष रहावे. (Link- https://www.mygov.in/aarogya-setu- app/))
- रुग्णांनी स्वतःची काळजी घेणे व नियमितपणे प्रकृतीबाबत पाठपुराव्याविषयी जिल्हा सर्वेक्षण अधिकारी/सर्वेक्षण पथकास माहिती देणे अनिवार्य आहे.
- रुग्णांने स्वतःचे गृह विलगीकरण करण्याविषयी प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) भरुन दयावे व सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे. प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर सदरील व्यक्तिस गृह विलगीकरणासाठी पात्र ठरविण्यात येईल.
- निकट सहवासितांना घरी करावायाच्या अलगीकरणासाठी (Home Qurantine) सविस्तर मार्गदर्शक सुचना खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. (Link- https://www.mohfw.gov.in/). काळजीवाहू व्यक्ती व रुग्णांसाठीच्या सुचना या परिशिष्ट क्र. २ मध्ये दिलेल्या आहेत.

३) वैद्यकिय मदत कधी घ्यावी ?

रुग्णांने स्वतः व काळजीवाहू व्यक्तींनी त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवावे. खालीलपैकी कोणतेही गंभीर लक्षणे/चिन्हे आढळून आल्यास त्वरीत वैद्यकिय मदत घ्यावी.

- धाप लागणे/श्वासोच्छवासास अडथळा निर्माण होणे.
- छातीमध्ये सतत दुखणे/वेदना होणे.
- संभ्रमावस्था/शुध्द हरपणे.
- ओठ/चेहरा निळसर पडणे
- उपचार करणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांची सल्ल्यानुसार, संदर्भ सेवेची गरज पडणे.

४) गृह विलगीकरण कधीपर्यंत करावे ?

गृह विलगीकरण खाली ठेवलेल्या व्यक्तीला लक्षणे सुरु झाल्यानंतर १७ दिवसानंतर किंवा रुग्णाला लक्षणे नसेल (asymptomatic) तर चाचणीसाठी नमुना (sample) ज्या दिवसी घेतलेला असेल तेथून १७ दिवसानंतर आणि मागील १० दिवसांपासून ताप येत नसेल तर गृह विलगीकरणातून व्यक्तिस मुक्त करावे. गृह विलगीकरणाचा काळ संपल्यानंतर परत कोवीड-१९ साठी चाचणी करण्याची आवश्यकता नाही.

6-6-2020

**( डॉ प्रदीप व्यास )**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औ.द्र. विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई -१
संचालक आरोग्य सेवा, मुंबई / पुणे.
उप संचालक आरोग्य सेवा (सर्व मंडळ)